महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
ठाकरसी हाऊस, 3 रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट-मुंबई

दूरध्वनी क्र २२६२२०२९-०२२/२२६२२०३६-०२२ Email.- jd.admin@mahakosh.in

क्र.संलेको/उ.ले-१/ कोषा-२६/एकस्तर-प्रोत्साहन भत्ता/२०२०/204 दिनांक : 27 OCT 2020

प्रति,

सहसंचालक,
लेखा व कोषागारे,
नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक/पुणे/कोकण विभाग
(ई मेल द्वारे)

विषय:- आदिवासी भागामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानूसार मुळ वेतनाच्या १५ टक्के किंवा कमाल रु १५००/- प्रोत्साहर भत्ता अदा करणे बाबत.

संदर्भ:- सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचे पत्र क्र. कोष/कोप्र-४/न.क्र.६३ /१४६४/२०२० दि १.१०.२०२०.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये संदर्भ क्र.१ नुसार शासनाने नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रम-कार्यक्षग अधिका-यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक विहित तत्वे व विविध सवलतीचे एकत्रित आदेश निर्गमित केलेले आहेत. आदिवासी भागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांना मुळ पदाच्या नजीकची वरिष्ठ / पदोन्नतीची वेतनश्रेणी देय आहे. तसेच मुळ वेतनाचे १५ टक्के किंवा रु १५००/- प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे. कोषागार कार्यालय, भंडारा, गोंदिया यानी सातव्या वेतन आयोगाचे संरचने नूसार प्रोत्साहन भत्ता मिळणे बाबत सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर यांचेकडे विचारणा केलेली आहे.

सहसंचालक, नागपूर यांनी मुळ वेतनाचे १५ टक्के किंवा रु १५००/- प्रोत्साहन भत्ता पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे किंवा सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे याबाबत मार्गदर्शन मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

Scanned with CamScanner

प्रोत्साहन भत्ता देण्याबाबतचे आदेश शासन स्तरावरुन अद्याप निर्गमित करण्यात आलेले नाहीत. तरी याबाबत सातव्या वेतन आयोगाचे वेतन संरचने नुसार प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत शासनाने आदेश निर्गमीत केलेले नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा दि.०६.०८.२००२ नुसार प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावे असे सहसंचालकांनी त्यांचे अधिनस्त कोषागार कार्यालयांना कळविण्यात यावे.

(ज. र. मेनन)
संचालक
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई.

प्रत : कोषागार अधिकारी, सर्व
यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner